**नि.दी.ख.कं. :-२३३/२०१५**
**जमिल - वि - सुलतान**
**<u>नि.क :- ४३</u>**

**<u>शपथेवर सरतपास वादी तर्फे श्री. काळे वकील साहेब:-</u>**

माझे शपथ पत्रातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे माझे वकिलांनी लिहीलेला आहे. तो मला माझे वकिलांनी समजुन सांगितलेला आहे. त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

२. प्रस्तुत प्रकरणात मी दस्त यादी **<u>निशाणी ४५</u>** खाली वादमिळकतीचा मेन्टनंन्स खस-याच्या प्रमाणित प्रती अनुक्रमांक १ व ३ वर दाखल केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे वादमिळकतीचे आखीव पत्रीकेच्या प्रमाणित प्रती **<u>अनुक्रमांक २,४ व ५</u>** वर दाखल केलेल्या आहेत. हे सर्व दस्तऐवज सार्वजनिक दस्त या स्वरूपात मोडत असल्यामुळे त्यांना अनुक्रमे **<u>निशाणी ४६ ते ५०</u>** देण्यात येत आहे.

**<u>उलट तपास प्रतिवादीतर्फे श्री. एस. एम. कुशवाह वकिल साहेब-</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत प्रकरणा अगोदर हलिमा बी हिचे विरूध्द दिवाणी दावा न्यायालयात दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तिचे निधनानंतर तिचे वारसांनी म्हणजेच प्रतिवादींनी सदरचा दावा पुढे सुरू ठेवला होता.

४. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीबाबत मी सज्ञान झाल्यापासुन मला संपुर्ण माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, हलिमा बी हिचे विरूध्द दिवाणी दावा दाखल केला होता त्यावेळीसुध्दा वादमिळकतीबाबत मला संपुर्ण माहीती होती. हे म्हणणे खरे आहे की, हलिमा बी विरूध्द दाखल केलेल्या दाव्यामध्ये माझे बाजुने निकाल लागला होता तर त्याचे विरूध्द झालेल्या अपिलामध्ये हलिमा बीचे बाजुने निकाल लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर न्याय निर्णयाविरूध्द उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, उच्च न्यायालयात मी सदरचे प्रकरण हरलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, हलिमा बी विरूध्द मी दाखल केलेले प्रकरण वरिष्ठ न्यायालयाने पुन्हा सुनावणीसाठी खालील न्यायालयात पाठविले होते व त्यामध्ये माझे विरूध्द निकाल झाला होता.

५. प्रस्तुतचे प्रकरण मी वादमिळकतीचा मालक या नात्याने प्रतिवादीविरूध्द दाखल केलेले आहे. वादमिळकतीचा मी भाडेकरू आहे या नात्याने प्रस्तुत प्रकरण दाखल केलेले नाही.

६. दिनांक ३१.०८.२०१५ रोजी प्रतिवादी हे वादमिळकत खाली करून घेण्यासाठी आमचेकडे आले होते. हे म्हणणे खरे आहे की, हलिमा बी विरूध्द दाखल केलेल्या प्रकरणाच्या वेळी मी तहसिल कार्यालयातून वेगवेगळी कागदपत्रे हस्तगत केली होती. हलिमा बी विरूध्द मी सन १९९९ मध्ये प्रकरण दाखल केले होते.

**प्रतिवादीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरून उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब -**

**वा.दा.ब.अ.क.के**
**स्वा/-**
**(आर.पी. बाठे)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क-स्तर,
कामठी.
दिनांक :-०१/०३/२०१७.

**समक्ष**
**स्वा/-**
**(आर.पी. बाठे)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश,क-स्तर,
कामठी.